वृक्ष लागवड व संगोपन कार्यक्रमाचे नियोजन, अंमलबजावणी आणि सनियंत्रणाबाबत तालुका स्तरावर मा. आमदार महोदयांच्या अध्यक्षतेखाली स्थायी समिती गठीत करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन निर्णय क्रमांक :- साववि-२०१९/प्र.क्र.५६/फ-११
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : ४ जून २०१९.

<u>संदर्भ :</u>- १) शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्रं. साववि-२०१५/प्र.क्र. १३१/फ-११ -- दिनांक ३१ मार्च २०१६.
२) शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्रं. साववि-२०१६/प्र.क्र. ८०/फ-११ दिनांक १० ऑक्टोबर २०१६.
३) शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्रं. साववि -२०१८/प्र.क्र. १४४/फ-११ दिनांक ६ सप्टेंबर २०१८.

<u>प्रस्तावना :-</u>

वातावरण, ऋतू आणि हवामान बदल यांची तीव्रता आणि दाहकता कमी करण्यासाठी "हरित महाराष्ट्र प्रकल्पाची" अंमलबजावणी संदर्भाधीन क्रं. १ व २ येथे नमूद केलेल्या शासन निर्णयातील मार्गदर्शक सुचनानुसार करण्यात येत आहे. या अंतर्गत २०१६ पासून वृक्ष लागवड व संगोपन कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्यात येत आहे. संदर्भ क्रं ३ येथील शासन निर्णयान्वये सन २०१९ मधील ३३ कोटी वृक्ष लागवड कार्यक्रमांतर्गत विविध प्रशासकीय विभागांमध्ये वृक्ष लागवडीचे उद्दिष्ट वाटप करण्यात आले आहे. त्यामध्ये वेळोवेळी आवश्यक सुधारणा करण्यात आल्या आहेत.

राज्यातील जैवविविधतेचे संरक्षण, संवर्धनाबरोबरच पर्यावरणाची सुरक्षितता राखण्यासाठी शास्त्रीयदृष्ट्या भौगोलिक क्षेत्राच्या ३३ टक्के वनक्षेत्र व वृक्षाच्छादन असणे गरजेचे आहे, राज्याचे वनक्षेत्र आणि वृक्ष आवरण सध्याच्या २० टक्केवरून ३३ टक्केवर नेण्यासाठी वृक्ष लागवड आणि संगोपन कार्यक्रम सातत्यपूर्ण रितीने राबविणे गरजेचे आहे.

वृक्ष लागवड व संगोपन कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्यासाठी जिल्हा व तालुका स्तरावर अनुक्रमे जिल्हाधिकारी आणि आणि उपविभागीय अधिकारी (महसूल) यांच्या अध्यक्षतेखाली नियोजन, अंमलबजावणी आणि समन्वय याकरिता समित्या नियुक्त करण्यात आल्या आहेत. सदर समितीमध्ये मा. आमदार आणि मा. खासदार यांना निमंत्रित करण्याबाबत आवश्यक त्या सूचना देण्यात आल्या आहेत. तथापि, वृक्ष लागवड व संगोपन कार्यक्रमात लोकप्रतिनिधींचा सक्रिय सहभाग असावा या दृष्टीने तालुका स्तरावर संबंधित आमदार महोदयाच्या अध्यक्षतेखाली स्थायी समिती नेमण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

प्रस्तावनेत नमूद केलेल्या बाबी विचारात घेऊन वृक्ष लागवड व संगोपन कार्यक्रमाचे नियोजन, अंमलबजावणी आणि समन्वय याकरिता संबंधित तालुक्याच्या आमदार महोदयांच्या अध्यक्षतेखाली खालीलप्रमाणे समिती गठीत करण्यात येत आहे.

१. तालुक्याचे मा. आमदार - **अध्यक्ष**.
(ज्या तालुक्याचे भाग २ किंवा जास्त विधानसभा मतदार संघात असेल त्यापैकी जास्त क्षेत्र असलेले मा. आमदार हे समितीचे **अध्यक्ष** व अन्य मा. आमदार **सह अध्यक्ष** राहतील.)
२. तालुक्यातील विधानपरिषदेचे सदस्य - **सह अध्यक्ष**
(जिथे लागू असेल तिथे).
३. तहसिलदार - **सदस्य.**
४. गटविकास अधिकारी - **सदस्य**.
५. मुख्याधिकारी (जेथे लागू असेल तेथे) - **सदस्य**
६. प्रशासकिय विभागांचे तालुका स्तरावरील अधिकारी - **सदस्य**.
७. वृक्ष लागवड व संगोपन आणि पर्यावरण क्षेत्रात काम करणाऱ्या अशासकिय संस्थेचे दोन पदाधिकारी (मा. आमदार महोदयांच्या मान्यतेने निवड केल्याप्रमाणे) - **सदस्य**.
८. वृक्ष लागवड, संगोपन आणि पर्यावरण क्षेत्रात काम करणाऱ्या दोन सन्माननीय व्यक्ती (मा. आमदार महोदयांच्या मान्यतेने निवड केल्याप्रमाणे) - सदस्य.
९. **हरित सेनेमधील नोंदणीकृत सदस्यांपैकी दोन सदस्य (आमदार महोदयांच्या मान्यतेने निवड केल्याप्रमाणे) -सदस्य.**
१०. मा. आमदार महोदयांच्या सहमतीनुसार अन्य आवश्यक अधिकारी/व्यक्ती - आमंत्रित सदस्य.
११. वन परिक्षेत्र अधिकारी : - **सदस्य - सचिव**.

समितीचे कार्यक्षेत्र खालीलप्रमाणे राहील :-

१. वृक्ष लागवड व संगोपन कार्यक्रमातंर्गत विविध प्रशासकीय विभागांना दिलेले उदिष्ट साध्य करण्यासाठी तालुका स्तरावर सूक्ष्म नियोजन आराखडा तयार करणे.
२. वृक्ष लागवडीच्या उदिष्टानुसार विविध प्रशासकीय विभागांसाठी वृक्ष लागवडीची लँड बँक तयार करणे.
३. वृक्ष लागवडीच्या उदिष्टास अनुरुप व २०% मरअळी धरून रोपांची उपलब्धतता होण्यासाठी रोपवाटिकांचे नियोजन व विकसन करणे. उंच, दर्जेदार व गुणवत्तापूर्ण रोपांची उपलब्धता होण्यासाठी आवश्यक त्या उपाययोजना करणे.
४. वृक्ष लागवड व संगोपन कार्यक्रमाच्या अमंलबजावणीसाठी विविध माध्यमातून मनुष्यबळाची उपलब्धतता.
५. तालुका स्तरावर वृक्ष लागवड व संगोपन कार्यक्रमातंर्गत शाळा, महाविद्यालयामधील विद्यार्थी, एनएसएस, एनसीसी, स्काऊट्स व गाईड्स आणि इतर माध्यमातून मनुष्यबळाची उपलब्धतता.
६. वृक्ष लागवडीसाठी शासनाने ठरवलेल्या कालमर्यादेनुसार संबंधित वर्षांच्या दि. ३१ मार्च किंवा शासनाने ठरवून दिलेल्या कालमर्यादेत खड्डे तयार करणे आणि त्यानंतर सदर खड्डे खत, माती, किटकनाशक इत्यादींनी भरून तयार ठेवण्याबाबत खात्री करणे.
७. वृक्ष लागवडीसाठीची लॅन्ड बँक, रोपवाटिका, तयार केलेले खड्डे, विविध वृक्ष लागवड कार्यक्रमात लावलेल्या झाडांचे जिवंत राहण्याचे प्रमाण इत्यादी संदर्भात व्हिडीओ क्लीप्स आणि उत्तम छायाचित्रे वनविभागाच्या संकेतस्थळावर १००% अपलोड करण्याबाबत खात्री करणे.
८. पावसाळ्यामध्ये वृक्ष लागवड व संगोपन कार्यक्रमाच्या अंमलबजावणीचे संनियंत्रण व देखरेख करणे.
९. वृक्ष लागवड व संगोपन कार्यक्रमातंर्गत लावलेल्या झाडांचे जिवंत राहण्याचे प्रमाण किमान ८० ते ९० टक्के राहण्यासाठी शासनाने ठरवून दिलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार हाती घेण्यात आलेल्या विविध उपाययोजनांसदर्भात पर्यवेक्षीय भूमिका बजावणे.

१०. त्याचप्रमाणे झाडे जिवंत राहण्याच्या प्रमाणाबाबत दि. ३१ मे आणि ३१ ऑक्टोबर या दिवशीच्या मोजणीप्रमाणे व्हीडीओ क्लिप्स आणि छायाचित्रे वन विभागाच्या संकेत स्थळावर अपलोड करणे.

११. दुष्काळ आणि पाणी टंचाई परिस्थितीमध्ये झाडे जगण्यासाठी विविध नाविन्यपूर्ण उपक्रम आणि उपाययोजना करणेबाबत अधिकाऱ्यांना मार्गदर्शन देणे.

१२. वृक्षांचे जिवंत राहण्याचे प्रमाण उत्तम राखण्यासाठी महिला बचत गट, अशासकीय संस्था, औद्योगिक आस्थापना व व्यावसायिक यांच्या सीएसआर व इतर अन्य माध्यमातून मदत मिळवणे. त्यातून वृक्षांचे संगोपन, संवर्धन आणि संरक्षण कार्यक्रम राबविणे.

१३. ग्राम सामाजिक परिवर्तन अभियानातंर्गत ज्या ग्रामपंचायती आणि गावे निवडण्यात आलेली आहेत, त्या अंतर्गत शासन निर्णय, महसूल आणि वन विभाग क्रं. साववि-२०१९/ प्र.क्र. ४४/फ -११ दि. १३ मे २०१९ अन्वये दिलेल्या सूचनेनूसार विविध घटकांबाबत करण्यात येत असलेली कार्यवाही.

१४. संयुक्त वन व्यवस्थापन समित्या आणि इको-विलेज समित्या यांचे सदस्य, चेअरमन यांना वृक्ष लागवड आणि संगोपन कार्यक्रमात मोठ्या प्रमाणात सहभागी करून घेणे. लोकसहभागातून वृक्ष लागवड आणि संगोपन ही संकल्पना अशा समित्यांद्वारे विस्तारित करणे.

१५. " महाराष्ट्र वृक्ष तोड (विनियमन) अधिनियम १९६४ " मधील तरतुदीनुसार जेथे वृक्षतोडीसाठी परवानगी दिली जाते, त्या बदल्यात संबंधित शेतकऱ्यांनी आणि जमीन मालकांनी झाडे लावण्याच्या अटीप्रमाणे कार्यवाही करण्याबाबत खात्री करणे. या उपक्रमात मोठ्या संख्येने झाडे लावण्यासाठी शेतकऱ्यांना आणि जमीन मालकांना उद्युक्त करणे.

१६. मा. आमदार आणि खासदार महोदय यांचा स्थानिक विकास निधी, डीपीसी, एमजी-नरेगा, मानव विकास अभियान, खनिज विकास निधी इ. माध्यमातून आणि अन्य विभाग तसेच केंद्र शासन यांच्याकडील जास्तीत जास्त निधी वृक्ष लागवड आणि संगोपन कार्यक्रमासाठी उपलब्ध करण्याबाबत प्रस्ताव तयार करून त्याची अंमलबजावणी करणे.

१७. शहरी आणि ग्रामीण भागातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या लोकप्रतिनिधीना वृक्ष लागवड आणि संगोपन कार्यक्रमात सहभागी करून घेणे. त्यासाठी कार्यशाळा, चर्चासत्र, सभा-समारंभ इत्यादी विविध माध्यमातून लोकप्रतिनिधींना माहिती देऊन त्यांना कार्यक्रमामध्ये सामावून घेणे.

१८. हरित सेनेमध्ये ज्या सदस्यांनी नोंद केली आहे, त्यांना वृक्ष लागवड आणि संगोपन, वन व निगडीत विषय, वृक्ष लागवडीशी संबंधित वैयक्तीक लाभाच्या योजना इत्यादीमध्ये सहभाग वाढवण्यासाठी त्यांना प्रशिक्षित करणे. त्याचबरोबर हरित सेनेमध्ये नोंदणीसाठी लोकांना विविध पर्यायांद्वारे प्रोत्साहित करणे.

१९. “हॅलो फॉरेस्ट वन जनवाणी कॉल सेंटर - १९२६” या कॉल सेंटरमार्फत लोकांनी वृक्ष लागवड आणि संगोपन, अवैध वृक्षतोड, वन वणवा, अतिक्रमण, शिकार आणि अवैध चराई इ. व इतर विषयांबाबत माहिती मिळविण्यासाठी व या समस्या कमी करण्याच्या दृष्टीने लोकांना विविध माध्यमातून सहभागी होण्यासाठी आवाहन करणे.

२०. शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्र. सावвि - २०१६/प्र.क्र. १६५/फ - ११ दि. २७ जून २०१८ अन्वये कन्या वन समृद्धि योजनेच्या अंमलबजावणीमध्ये जास्तीत जास्त लाभार्थ्यांना व्यापक आणि विस्तृत प्रसिद्धि करून सहभागी करून घेणे.

२१. शासन निर्णय नगर विकास विभाग क्रं. २०१६/प्र.क्र. ६०/नवि - ३४ दि. १ मार्च २०१८ आणि शासन निर्णय ग्राम विकास विभाग क्र.२०१८/प्र.क्र. ४/प.रा. ६ दि. १६ मार्च २०१८ अन्वये मु.पो. रानमाळा, ता. खेड जिल्हा पुणे येथील ग्रामपंचायतीच्या धर्तीवर वृक्ष लागवड आणि संगोपन कार्यक्रम राबविण्यासाठी संबंधित

ग्रामपंचायत आणि नगरपालिका यांना प्रोत्साहन देऊन उद्युक्त करणे. त्याचबरोबर लाभार्थीना या कार्यक्रमातंर्गत वृक्ष लागवडीसाठी पुढाकार घेण्याबाबत जागरुकता निर्माण करणे.

२२. शासन निर्णय, नियोजन विकास (रोहयो कक्ष) क्रं मग्रारो-२०१६/प्र.क्र.६१/मग्रारो-१ दि. १२ एप्रिल २०१८ अन्वये शेतकऱ्यांना वनशेतीसाठी आवाहन करणे आणि त्यांचा मोठ्या प्रमाणात सहभाग मिळवणे.

२३. शासन निर्णय कृषी विभाग क्रं राफयो-२०१८/प्र.क्र.४७/९-अे, दि. ६ जुलै २०१८ अन्वये भाऊसाहेब फुंडकर फळझाड लागवड योजनेत शेतकऱ्यांना मोठ्या संख्येने सहभागी करुन त्यांना प्रोत्साहित करणे.

२४. शासनाच्या विविध फळझाड लागवड योजनांव्यतिरिक्त इतर माध्यमांतून खाजगीरित्या शेतकऱ्यानी वनशेती आणि फळझाड लागवडीकरिता पुढे यावे यासाठी शेतकऱ्यांची मनोधारणा बदलण्यासाठी प्रयत्न करणे.

२५. तालुक्यातील वनक्षेत्र आणि वृक्षाच्छादन ३३ टक्केवर नेण्यासाठी ग्रामीण भागातील ग्रामपंचायती आणि शहरी भागातील नगरपालिका आणि महानगरपालिका क्षेत्रामधील विकास आराखड्याच्या धर्तीवर वृक्ष लागवड आराखडा (Tree Plantation Plan) तयार करून घेण्यासाठी मार्गदर्शन करणे.

या समितीच्या किमान दोन महिन्यांतून एकदा बैठका व्हाव्यात. **मा. अध्यक्ष महोदयांच्या सहमतीने आवश्यकतेनुसार जास्तीच्या बैठका बोलावता येऊ शकतील.** बैठकीचे इतिवृत्त आणि घेतलेले निर्णय वन विभागाच्या संकेतस्थळावर टाकावेत. त्यामुळे राज्यातील वेगवेगळ्या भागांमध्ये वृक्ष लागवड आणि संगोपन कार्यक्रमाबाबत नवीन विचार, संकल्पना यांचे आदान प्रदान होईल आणि त्यातून हा कार्यक्रम अधिक सक्षमतेने विकसित होण्यासाठी मदत होईल.

वर नमूद केलेल्या तालुका स्तरावरील समित्या तात्काळ कामकाज सुरू करतील. सन २०१९ मधील पावसाळ्यामध्ये होणाऱ्या ३३ कोटी वृक्षारोपण किंवा त्यानंतर होणाऱ्या वृक्ष लागवड व संगोपन कार्यक्रम विविध माध्यमातून यशस्वी होण्यासाठी सदर समित्या महत्वपूर्ण भूमिका बजावतील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१९०६०४१७२४०७९५१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

VIRENDRA RAMBAHAL TIWARI

Digitally signed by VIRENDRA RAMBAHAL TIWARI
DN: c=IN, st=Maharashtra, 2.5.4.20=a95e1a9759002ee190cd79464daaba7dc840ec375cd62a646a64986631086810, postalCode=400032, street=R AND F D,4TH FLOOR,MANTRALAYA,MUMBAI, ou=FOREST DEPARTMENT, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=VIRENDRA RAMBAHAL TIWARI
Date: 2019.06.04 17:52:20 +05'30'

(वीरेन्द्र तिवारी)

अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (मंत्रालय)

प्रत,

१. मा. विरोधी पक्षनेता, विधान परिषद / विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.

२. सर्व सन्माननीय विधानसभा, विधान परिषद व संसद सदस्य.

३. मा. मुख्य सचिव.

४. मा. राज्यपाल महोदयांचे सचिव, राजभवन, मुंबई.

५. मा. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव.

६. अपर मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग.

७. अपर मुख्य सचिव (नियोजन), नियोजन विभाग.

८. सर्व प्रशासकीय विभागांचे अप्पर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/सचिव.
९. सर्व मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव / स्वीय सहायक.
१०. प्रधान मुख्य वनसंरक्षक, (वनबल प्रमुख), नागपूर.
११. प्रधान मुख्य वनसंरक्षक, सामाजिक वनीकरण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१२. व्यवस्थापकीय संचालक, वन विकास महामंडळ, नागपूर.
१३. मुख्य कार्यकारी अधिकारी , ग्राम सामाजिक परिवर्तन फाउंडेशन कंपनी, मुंबई.
१४. सर्व प्रधान मुख्य वनसंरक्षक.
१५. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
१६. सर्व अप्पर प्रधान मुख्य वनसंरक्षक.
१७. सर्व विभागीय आयुक्त (महसूल).
१८. सर्व जिल्हाधिकारी.
१९. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद.
२०. सर्व आयुक्त महानगरपालिक.
२१. सर्व मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक).
२२. सर्व उप वनसंरक्षक (प्रादेशिक).
२३. वनसंरक्षक, सामाजिक वनीकरण वृत्त, कोकण ठाणे, पुणे, नाशिक, औरंगाबाद, अमरावती, नागपूर .
२४. सर्व प्रशासकीय विभागांचे प्रादेशिक प्रमुख व विभाग प्रमुख.
२५. सर्व विभागीय वन अधिकारी, सामाजिक वनीकरण विभाग, (सर्व जिल्हे)
२६. महालेखापाल, (लेखापरीक्षा / लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र १ व २ , मुंबई व नागपूर,
२७. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
२८. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई -४०० ०३२.
२९. सर्व महामंडळे / मंडळे, शासकीय उपक्रम.
३०. निवासी परिक्षा लेखा अधिकारी,मुंबई.
३१. वित्त विभाग, व्यय-०९, अर्थसंकल्प- ०६ मंत्रालय, मुंबई-३२.
३२. कार्यासन अधिकारी, फ-२,फ-७,महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
३३. कार्यासन अधिकारी, ब-१,महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
३४. सह सचिव/उप सचिव/अवर सचिव (सर्व), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
३५. निवडनस्ती/फ-११.

****